# ARCA News Bulletin

ARCA News Bulletin मे २०२२ अंक ५ वा मराठी आवृत्ती नागपूर

## राज्यातील अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयामध्ये अध्यापकांची भरती होणार शासनामार्फतच

### मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निकाल

औरंगाबाद :अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापकांची पदे शासनस्तरावरच भरली जातील, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे. शासनाने २०१७ मध्ये घेतलेल्या निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर हा आदेश देण्यात आला आहे. यामुळे राज्यभरातील १६ अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांच्या संचालकांमध्ये चलबिचल निर्माण झाली आहे. शासनाने पदभरतीचा निर्णय घेतल्यानंतर आमचा अधिकार हिसकावून घेतल्याची ओरड करत संचालकांनी औरंगाबाद खंडपीठातधाव घेतली होती. याचिका दाखल करण्यात आली त्यावेळी सर्व महाविद्यालय मिळून ३०४ हून अधिक जागा रिक्त होत्या. यवतमाळ, अकोला, नागपूर, अमरावती, मोझरी, अहमदनगर, सोलापूर, सांगली, सातारा, बोराडी (धुळे), मुंबई येथे दोन, सावंतवाडी, नाशिक आणि पुणे येथे दोन अशी एकूण १६ अनुदानित आयुर्वेद महाविद्यालय आहेत. बौराडीसह इतर ठिकाणचे चार अशा पाच महाविद्यालयांचे संस्थाचालक न्यायालयात गेले होते. आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये नॉर्म्स नुसार पदभरती करण्याचे आदेश सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीनने (सीसीआयएम) महाराष्ट्र शासनाला दिले होते. यानुसार शासनाने पदनिर्मिती केली. तेथूनच पदभरतीच्या अधिकाराचा तिढा निर्माण झाला. महाराष्ट्र शासन |आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने संस्थाचालकांनी न्यायालयाची दारे ठोठावली. याचिकेवर निर्णय देताना पदभरतीचे अधिकार न्यायालयाने शासनाला बहाल केले आहे. या निर्णयामुळे आता पद भरतीचा मार्ग मोकळा झाला असून या सर्व महाविद्यालयांमध्ये येत्या काही दिवसात नव्याने पदभरती होणार असल्याने आयुर्वेद क्षेत्रातील अध्यापकांना मध्ये उल्हासाचे वातावरण आहे.

### आयुर्वेद उपचार पद्धती जागतिक स्तरावर पोहोचेल :

**डॉ. तेड्रोस जागतिक आरोग्य संघटनेचे (WHO) प्रमुख**

WHO ग्लोबल सेंटर फॉर ट्रॅडिशनल मेडिसिन हे पारंपारिक औषधांच्या शक्तीला यश मिळवून देण्यासाठी, जगभरातील लोकांना सुरक्षित आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवेचा लाभ मिळण्याची खात्री करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल असेल. या केंद्राच्या माध्यमातून भारत जगभर पोहोचेल आणि जग भारतात येईल, असे मत जागतिक आरोग्य संघटनेचे प्रमुख डॉ. तेड्रोस यांनी गुजरात येथे झालेल्या एका सभेमध्ये केले.

## आयुर्वेद वैद्यांची होणार छावनी रुग्णालयात भरती

### आयुष व संरक्षण मंत्रालयाचा सामंजस्य करार

पुणे : नुकताच जामनगर येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात आयुष मंत्रालय भारत सरकार व संरक्षण मंत्रालयात सामंजस्य करार झाला असून देशातील संरक्षण खाते अंतर्गत असलेल्या विविध सैनिकांच्या दवाखान्यामध्ये आयुर्वेदाच्या तज्ञ डॉक्टरांची पदभरती केल्या जाणार असल्याचे दोन्ही मंत्रालयाकडून जाहिरात प्रकाशीत करण्यात आली असून सध्या विविध १५० पदासंठी पदभरती प्रक्रिया सुरू झालेली आहे. केंद्रीय संरक्षण मंत्रालयातर्फे याबाबत माहिती देताना सांगण्यात आले की, केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या वतीने या उपक्रमासाठी कुशल आयुष डॉक्टर्स आणि फार्मासिस्ट यांची नेमणूक करण्यात येणार आहे.येत्या १५ मे २०२२ ला ही परीक्षा घेण्याचे ठरले असताना आता नवीन पात्रता आणि अनुभव निकष बदलण्याचे CCRAS कडून कळविण्यात आले असून त्यानंतर पुन्हा नव्याने अर्ज मागवण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे किंवा कदाचित परीक्षा पुढे लांबणीवर जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. देशातील छावणी रुग्णालयातील रुग्णांना आयुर्वेदातील पारंपरिक उपचारांचा लाभ देण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाकडून घेण्यात आला आहे. यामध्ये देशातील ३७ छावणी रुग्णालये निश्चित करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे यामध्ये महाराष्ट्रातील खडकी ,देहूरोड व कामठी नागपूर येथील रुग्णालयांचाही समावेश केला गेला आहे. संरक्षण मंत्रालयाच्या या निर्णयामुळे संरक्षण दलांतील कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय तसेच छावणी परिसरातील निवासी आणि सामान्य नागरिकांना आयुर्वेदिक उपचार मिळणार आहेत.

### आयुर्वेद रिसर्च व करिअर अकॅडमी मार्फत मार्गदर्शन शिबिर संपन्न

आयुष मंत्रालय व संरक्षण मंत्रालय अंतर्गत छावण्यांच्या रुग्णालयात आयुर्वेद तज्ञांची भरती होणार असल्याचे जाहीर होताच आयुर्वेद रिसर्च व करिअर अकॅडमी मार्फत १ मे २०२२ रोजी एक वेबिनार आयोजित केले होते. त्यामध्ये डॉ. एस. के.डांगा यांनी ह्या पद भरती संदर्भात विविध नियम, परीक्षेचे स्वरूप, इत्यादी बाबत संपूर्ण माहिती वेबिनार मार्फत दिली. यासाठी संपूर्ण भारतभरातून आयुर्वेदिक वैद्यांनी नोंदणी केली होती .

ARCA न्यूज ब्युलेटीनला बातमी व जाहिरात देण्यासाठी संपर्क करा: Click On What's App

# राज्यातील सर्व आयुर्वेद महाविद्यालयात सामाजिक आरक्षण लागू, विद्यापीठाचे ही निर्देश

मुंबई : **शासन निर्णय:** राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/ संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीमधील संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्व शैस्खिनक संस्थाना देण्यात आले आहे. शासन अधिसूचना दि.०७.०४.२०२२ मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार प्रत्येक विद्यापीठातील तसेच एकाच व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखालील सर्व महाविद्यालयांतील अध्यापक संवर्गातील (समान वेतनश्रेणीतील) सर्व विषयांतील मंजुर पदे एकत्रित करण्यात यावीत. संवर्गनिहाय आरक्षण हे संवर्गातील एकुण मंजूर पदांची संख्या विचारात घेऊन प्रचलित आरक्षण धोरणातील विहित टक्केवारीनुसार निश्चित करण्यात यावे. तसेच समांतर आरक्षणासंदर्भात शासनाच्या प्रचलित आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.संवर्गातील एकूण मंजूर पदे व कार्यरत पदे विचारात घेऊन संवर्गाची बिंदुनामावली पदांच्या गोषवाऱ्यासह विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. तद्नंतर महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार संवर्गनिहाय आरक्षण हे संवर्गातील एकुण मंजूर पदांच्या संख्येस लागू होणार असल्याने त्याप्रमाणे बिंदुनामावलीची तपासणी करुन शासन निर्णय दि.१८.१०.१९९७ मधील तरतुदीनुसार रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करण्यात यावे व सदर बिंदुनामावलीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक राहील. या निर्णयामुळे गेल्या कित्येक वर्षापासून प्रलंबित असलेल्या भरती मध्ये सर्व मागासवर्गीय असलेल्या प्राध्यापकांसाठी नवीन संधी उपलब्ध होणार असून हा निर्णय लवकरच लागू होईल अशी अपेक्षा सर्व प्राध्यापक वर्गातून करण्यात येत आहे.

*(या संदर्भात डॉ.एस.के. डांगा यांनी **आयुर्वेद रिसर्च व करिअर अकॅडमी** मार्फत घेण्यात आलेला विशेष कार्यक्रम बघण्यासाठी **येथे क्लिक करा**.)*

## आयुर्वेद शिक्षकांचे वेतन नियमित करा – NCISM

**नवी दिल्ली :** भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाकडून शिक्षकांचे वेतन योग्य वेळेवर व्हावे, तसेच नियमानुसार व्हावे या बाबत सर्व आयुर्वेद महाविद्यालय यांना ताकीद दिली असून वेळेत व नियमित वेतन न झाल्यास त्यांची परवानगी काढण्यात येईल असे आदेश दिले आहेत. परंतु या आदेशाची किती अंमलबजावणी होईल याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. हा बदल ह्या वर्षी पार्ट -१ भरताना सर्व महाविद्यालयानी पाळावा लागणार असून ह्या नियमचे पालन न केल्यास त्याची पुढील वर्षाची परवानगी नाकारण्यात येईलअसे निर्देश दिले आहेत.

Articles are invited for June 2022 issue
International Journal of Indian Medicine (IJIM) www.ijim.co.in
Email : arcaexperts@gmail.com

**विशेष लेख:**

## येत्या काळात घर, गाडी खरेदी, उच्च राहणीमान होणार कठीण..

जागतिक स्तरावर चालू असलेले युद्ध, आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत होत असलेले राजकीय बदल त्यामुळे सतत वाढणाऱ्या इंधन दर तसेच वाढत असलेली महागाई यामुळे येत्या काळामध्ये स्वतःचे घर घेणे, गाडी घेणे महाग होणार असून याची सर्वसामान्यांना प्रचंड झळ बसणार आहे. याशिवाय मागच्या दोन वर्षापासून सर्व प्रकारच्या अन्नधान्यांच्या किमती सुद्धा वाढत चाललेल्या आहेत. त्यातच भर म्हणून नुकतेच भारतीय रिझर्व बँकेने आपल्या रेपो रेट दरामध्ये वाढ केली असल्यामुळे सर्व बँकांचे कर्ज व तसेच घराचे हप्ते महागण्याची दाट शक्यता आहे. किंबहुना काही बँकांनी आपल्या व्याज दरामध्ये तत्पूर्वीच वाढ केलेली आहे. वाढते इंधन दर, वाढते गृहकर्ज वाहन कर्ज इत्यादी सर्व गोष्टींच्या दैनंदिन आर्थिक आर्थिक व्यवहारावर खूप मोठ्या प्रमाणात फटका बसत असतानाच विविध सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वेतन मात्र वाढ होण्याची काही शक्यता नाही. अनेक आयुर्वेद महाविद्यालयातील तुटपुंज्या वेतनावर अध्यापक आपले जीवन व्यतीत करताना दिसून येत आहे. यातच भर म्हणजे नवीन आलेल्या शिक्षकांना सुद्धा कमी वेतनात काम करावे लागत असल्यामुळे त्यांना भविष्यातील स्वतःचे घर घेणे, स्वतःचे वाहन घेणे, मुलाचे शिक्षण इ. कठीण होऊन बसणार आहे कारण ज्या बँका त्यांना कर्ज देणार आहे हे त्यांचे उत्पन्नाचे साधन बघूनच कर्ज उपलब्ध करून देत असतात त्यामुळे गृह कर्ज , वाहन कर्ज मिळवणे अतिशय कठीण होऊन बसणार आहे.

## नागपूर येथे निमाचा अमृत महोत्सव उद्घाटन

नागपूर: नॅशनल अमृत महोत्सव कार्यक्रम नागपूर येथे कविवर्य सुरेश भट सभागृह येथे नुकताच पार पडला. दि. २४ एप्रिल २०२२ रोजी या कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय राष्ट्रीय चिकित्सापद्धती आयोगाचे सभासद डॉ. राकेश पंडीत यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉ. के.पी. यादव, आयुष संचालक संचालक डॉ. गोविंद खटी, निमा केंद्रीय परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनायक टेंभुर्णीकर,डॉ रवींद्र बोथरा, नागपूर निमा शाखेचे अध्यक्ष डॉ. शैलेंद्र अग्रवाल, निमा टीचर फोरमचे डॉ. विष्णू बावणे याशिवाय अनेक मान्यवर देशभरातून या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमात संपूर्ण भारताच्या २० सूत्री कार्यक्रम कशा पद्धतीने राबवला जाईल व मागच्या 74 वर्षाची नियमाची वाटचाल कशी राहिली याची सविस्तर माहिती डॉ.आशुतोष कुलकर्णी यांनी दिली येथे दिली. यादरम्यान आयुर्वेद पदवीधारक असणारे मध्यप्रदेश चे खासदार डॉ. के.पी. यादव यांनी आपल्या भाषणात केंद्र शासनाच्या आयुष विभागाची आरोग्य योजनेची माहिती दिली आणि केंद्रीय आरोग्य समितीचे सभासद या नात्याने आयुर्वेदाच्या प्रगतीसाठी त्यांची खंबीर भूमिका असल्याचे सभागृहाला सांगितले. या कार्यक्रमासाठी साधारणता भारतभरातून बाराशेच्यावर आयुर्वेद पदवी, पदव्युत्तर पदवीधारक, अध्यापक, चिकित्सक यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. जय छांगाणी तसेच डॉ. मोहन येंडे, निमा विद्यार्थी फोरम चे डॉ.राहुल राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले.